महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या – ५०

मुंबई मेट्रोचे कारशेड आरे गोरेगाव येथून कांजूरमार्ग येथे उभारण्याबाबत

(१) २७४११ (१३-०६-२०२१). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रोचे कारशेड आरे गोरेगाव येथून खारजमीन असलेल्या कांजूरमार्ग येथे हलविण्यात यावे, याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. यांनी माहे ऑक्टोबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांजूरमार्ग येथील जागा खारजमीन असून शासकीय सदस्य समिती (मदन समिती व मनोज सौनिक समिती) यांनी सदर जागा मेट्रो कारशेडसाठी उपयुक्त नसल्याचे त्यांच्या अहवालात नमुद केलेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरण हे मा.उच्च न्यायालयात सुरु असल्यामुळे कारशेड उभारण्याच्या कामाला अधिकचा वेळ लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने प्रलंबित असलेले मुंबई मेट्रोचे कारशेड उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) व (२) अंशत: खरे आहे.

विशेषज्ञ समिती (श्री मदान समिती) अहवालानुसार हे खरे नाही. तथापि, शासकीय सदस्य समितीच्या (श्री सौनिक समिती) अहवालात कांजूरमार्ग येथील जागेच्या भू-तांत्रिक अहवालाच्या तपासणीच्या आधारे, काजूरमार्ग येथील जागा सखल आणि पाणथळ असल्याने त्यावर डेपो बांधण्यापूर्वी मातीच्या थराचे पूर्व-एकात्मीकरण (pre-consolidation) करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

(३), (४) व (५) हे खरे आहे.

कांजूरमार्ग येथे कारशेड उभारण्यासाठी तांत्रिक व आर्थिक बाबींची शक्यता तपासण्यात आली, तथापि कांजूरमार्ग येथील जमीन राज्य शासनाच्या ताब्यात नसल्याने व त्या जमिनीच्या मालकीहक्काबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका प्रलंबित आहे. तसेच सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश यामुळे सदरहू जागेचा ताबा अद्याप मिळाला नसल्याने आणि मुंबई मेट्रो मार्ग-३ चे तीन चतुर्थांश पूर्ण झाल्याने प्रकल्पास होणारा अधिकचा विलंब प्रकल्पाच्या दृष्टीने अव्यवहार्य व कालविसंगत राहील या बाबी विचारात घेऊन आरे दुग्धवसाहत येथील शासकीय जमीनीवर कारशेड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भूसावळ नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील नगर परिषद अग्नीशमन सेवा संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

(२) ३३२९९ (१७-०१-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र नगर परिषद अग्नीशमन सेवा संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, अग्नीशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी मुख्यधिकारी, भूसावळ नगर परिषद यांनी दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया प्रदीर्घ काळापासून अग्निशमन दलातील रिक्त पदे न भरल्यामुळे नागरीकांच्या जिविता संबधीत गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

भुसावळ नगरपरिषद अग्निशमन संवर्गाची मंजूर ५ पदे व इतर संवर्गाची पदे उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना मुख्याधिकारी, नगरपरिषद भुसावळ, जि. जळगांव यांनी दि. ०४ फेब्रुवारी, २०२० रोजी सादर केलेला आहे.

(२), (३) व (४) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने अग्निशमन सेवा संवर्गासह अन्य सात संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, गट - क व ड संवर्गातील पदांची निकड विचारात घेऊन, सदर पदे लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

जिंतुर (जि.परभणी) शहराला नगरपरिषदेकडून अनियमित होणाऱ्या पाणीपुरवठाबाबत.

(३) ३३३७७ (०२-०२-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) शहरासाठी तीन पाणी पुरवठा योजना होऊनही नगरपरिषदेच्या नियोजनाअभावी अद्यापही जिंतूर शहराचा पाणीप्रश्न सुटत नसल्याने नागरिकांचे पिण्याच्या पाण्यापासून गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा योजनेच्या उभारणीच्या वेळी दरडोई ७५ ते १२५ लिटर पाणी पुरवण्याचे आश्वासन दिले जाते मात्र शहराचा पाणीपुरवठा कधी सुरळीत होत नसल्याने चार ते सहा दिवसातून एकदाच नळाला पाणी येते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन जिंतूर शहराच्या पाणीपुरवठा संबंधी कायमस्वरूपी चा तोडगा काढून जिंतूर शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) जिंतूर नगरपरिषदेमार्फत जुने जलशुद्धीकरण केंद्र सुरु करण्यात आले असून, सद्यस्थितीत जिंतूर शहरास दर दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील येलदरी-फाळेगाव-रस्त्यावर बेकायदेशीर व्यापारी संकुल बांधल्याबाबत

(४) ३३३९२ (११-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात राज्य मार्ग २४८ जिंतूर-येलदरी-फाळेगाव रस्त्यावरील कृषी उत्पन्न बाजार समिती, जिंतूर येथील प्रशासनाकडून बेकायदेशीरपणे सर्विस रोडवर व्यापारी संकुल बांधण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमानुसार राज्य रस्त्याच्या मध्यापासून ३७ मीटर बांधकाम करणे गरजेचे असताना केवळ ५० फूट अंतरावर सदरील व्यापारी संकुल बांधण्यात आलेले असून, नगररचना वरिष्ठ कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यापैकी कोणाचीही परवानगी न घेता जिंतूर नगरपरिषद मधील संबंधितांच्या संगनमताने सदर व्यापारी संकुल बांधण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वरिष्ठ स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी मुख्य प्रशासक / सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. सदर प्रकरणी बांधकाम परवानगीकरिता नगरपरिषदेस प्राप्त झालेला प्रस्ताव परिपूर्ण नसल्यामुळे प्रलंबित असून, अद्याप बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. सदर प्रकरणी जिंतूर नगरपरिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नं.६/१ ते ६/८ व ६ पर्यंतचे
नामांतर अनधिकृतपणे केल्याबाबत

(५) ३३३९७ (१७-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.६/१ ते ६/८ व ६ पर्यंतचे नामांतर जिंतूर नगरपरिषदेच्या नामांतर विभागामार्फत अनधिकृतपणे झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे अनेक नामांतराचे प्रकार जिंतूर नगरपरिषदेमार्फत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संबंधी लेखी तक्रार दक्ष नागरिकांकडून विभागीय आयुक्त कार्यालय, नगरपालिका प्रशासन, औरंगाबाद यांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित लेखी तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयास दिली आहे, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, परभणी यांनी अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार, मालमत्ता कर नोंद भुमापन क्र. ६ मधील भुखंड नोंदी रद्द करण्यात आल्या असून, नामांतर विभागास यापुढे भुसंपादन क्र. ६ व २ मधील मालमत्ता हस्तांतरण प्रकरणातील अर्ज स्विकारु नयेत, असे आदेशित केले आहे. तसेच सदर प्रकरणी दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी, सेलू यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीच्या २६ प्रकरणातील हस्तांतरणे ही शेती विभागात ग्रीन झोनमध्ये नियमबाह्य हस्तांतरीत झाल्यामुळे सदर नियमबाह्य नोंदी रद्द करण्याबाबतची कार्यवाही करुन, सदर नामांतर प्रकरणात जबाबदार कर्मचारी यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्र.४६ मधील माऊली चौक ते लोढा हेवन ते म्यारेथान नगरी हे दलित वस्ती योजने अंतर्गत असलेल्या कामाच्या निविदा वेळेत उघडल्या नसल्याबाबत

(६) ३३५१७ (०२-०२-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वार्ड क्र.४६ मधील माऊली चौक ते लोढा हेवन ते मॅरेथान नगरी हे दलित वस्तीयोजने अंतर्गत असलेल्या कामाच्या निविदा वेळेत उघडल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार वेळेत निविदा न उघडता आपल्या मर्जीतील ठेकेदाराला निविदा लागण्यासाठी काम करणाऱ्या नगरपालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०२२) : (१), (२) व (३) वार्ड क्र.४६ मधील माऊली चौक ते लोढा हेवन ते मॅरेथॉननगरी पर्यंत रस्त्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा वेळेत उघडल्या नाही, ही वस्तूस्थिती आहे.
- तथापि, नगरपरिषद हद्दीमध्ये विविध विभागामार्फत विकास कामे करण्यात येत असल्यामुळे संबंधित रस्त्याचे काम अन्य विभागाकडून मंजूर केलेले आहे किंवा नाही याबाबत खातरजमा करण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून सुरु असल्याने प्राप्त निविदांची निविदा समितीकडून तांत्रिक तपासणी करण्यात आली नाही.
- याबाबत खातरजमा झाल्यानंतर पात्र निविदाधारकांमधून न्युनतम दराच्या निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात आली आहे.
- सद्यस्थितीत रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून विहित मुदतीत काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेमध्ये संगनमताने केलेला गैरव्यवहार

(७) ३५७५४ (०२-०२-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई नगर परिषदेमार्फत शहरातील स्वच्छतेबाबत १) अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्र.०१ ते १४ मधील मोठ्या व लहान नाल्यांमधील गाळ काढणे. (कामाची किंमत रु.१०,२८,७३६ /- दरमहा कालावधी- १२ महिने) २) अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्र. ०१ ते १४ मधील मिळकतींमध्ये घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचरा गोळा करुन स्वच्छता सेवा पुरविणे (कामाची किंमत रु.१०,४९,२००/- दरमहा कालावधी-१२ महिने) असे दोन कंत्राट काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दोन्ही कंत्राटाच्या ई- निविदा मागवुन सर्वात कमी दर असलेल्या बी.के.एन.एन.एस. अमरावती. या एजन्सीजला काम मंजुर करण्यात येऊन त्याबाबत दि. ०७ मार्च, २०१९ रोजी कार्यादेश देण्यात आले असून, सदरील काम दिनांक १४ मार्च २०१९ पासुन प्रत्यक्षात सुरु करण्यात आले आहे. त्यानुसार कंत्राटदाराची मुदत माहे फेब्रुवारी २०२० मध्येच संपलेली असताना नगर परिषदेच्या अधिकारी व सत्ताधाऱ्यानी अनाधिकृत ठराव घेऊन सदरील कंत्राटदारास दुसरा कंत्राटदार मिळेपर्यंत म्हणजेच आजन्म कार्यादेश देण्यात आले जे बेकायदेशीर असून मुदत संपल्यानंतरही या कंत्राटदारास अनाधिकृत मुदतवाढ देऊन काम सुरु ठेवण्यात आले व लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आल्याचे कागदोपत्री पुराव्यासह निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास वरील दोन्ही कंत्राटामध्ये अंबाजोगाई, नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी, अभियंता, कंत्राटदार, नगराध्यक्षा, यांनी आपसात संगनमत करून स्वच्छता कंत्राटात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबतची तक्रार अंबाजोगाई नगरपरिषदेचे जेष्ठ नगरसेवक श्री.शेख रहीम शेख रज्जाक व श्री.सारंग अरुण पुजारी यांनी पूर्ण कागदोपत्री पुराव्यासह जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रभाग क्र. ०१ ते १४ मधील नाल्यातील गाळ काढणे या कंत्राटाचे देयके अदा करताना तयार करण्यात आलेल्या मोजमाप पुस्तिकेमध्ये कंत्राटाची किंमत रु.१०,२८,७३६/- प्रतीमहा असताना त्यापेक्षा अधिक रक्कमेची देयके अनाधिकृतपणे अदा करून लाखो रुपयांचा मोठा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे तसेच सदर कचरा टाकण्यासाठी सादर करण्यात आलेल्या वजनांच्या पावत्यावर असलेले ट्रॅक्टरचे नंबरही बनावट असून एम.एच. ४४ बी २४९१ हे ट्रॅक्टर नसुन फोर्ड कंपनीची फिगो कार आहे तसेच एम.एच. ४४ बी ९६१ हे ट्रॅक्टर नसुन तवेरा जीप ही गाडी असल्याचे रस्ते वाहतून कार्यालयातून (R.T.O.) स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहे मार्च, २०२० ते जुन २०२० मध्ये संचारबंदी लावण्यात आली असतांना शासनाने सर्व शासकिय, निमशासकिय, खाजगी कार्यालये, सर्व आस्थापने व बांधकामे बंद करण्याचे आदेश दिले होते. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने लॉकडाऊन काळातले एकाच कंत्राटाचे जवळपास रु.७४,०३,५५७/- इतक्या रकमेचे बोगस व बनावट देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वरील प्रकरणामध्ये नियमानुसार कोणतीही प्रक्रिया न करता, स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमताने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, कर्मचारी व नगराध्यक्ष यानी स्वच्छता कंत्राटामध्ये खोटे व बनावट अभिलेख तयार करुन सदरील कामामध्ये शासकिय निधीचा गैरवापर करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे तक्रारदारांनी दिलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे सदरील प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन मुद्यानिहाय सखोल चौकशी करुन सदर प्रकरणातील दोषी यांच्यावर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व संबंधीत दोषींवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे संपूर्ण कागदोपत्री पुराव्यासह दिनांक १९ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे,

(२) सदर प्रकरणी मा. लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केलेली तक्रार प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने

तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु असून अंतिम सुनावणी दि. ०२.०८.२०२२ रोजी ठेवण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे,

(४) व (५) सदर प्रकरणी मा. लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केलेली तक्रार प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु असून अंतिम सुनावणी दि. ०२.०८.२०२२ रोजी ठेवण्यात आली आहे.

(६) व (७) हे खरे आहे,

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषदेमध्ये कारखाना फिल्टर हाऊस येथील विहिरीतील गाळ काढणे प्रकरणामध्ये लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार

(८) ३५७५५ (१७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेमध्ये कोणतेही ई-टेंडर न काढता सन २०२०-२१ मध्ये शहरातील विहिरीतील गाळ काढण्यासाठी कंत्राटदाराकडून दरपत्रक मागवण्यात आले असून, सदर कामाचे स्थायी समितीच्या बैठकीपूर्वीच कंत्राटदाराला दिनांक ११ जून, २०२० रोजी मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने कार्यादेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुलनात्मक तक्ता तयार करून त्याच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक असतांना सुद्धा अशा प्रकारची कोणतीही मान्यता घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थायी समितीच्या बैठकीपूर्वीच सदर कंत्राटदाराला दिनांक ११ जून, २०२० रोजी मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षरीने कार्यादेश देण्यात आले. त्यानंतर सदर दरपत्रक दिनांक २१ जुलै, २०२० रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मंजूर करून कायद्याच्या विरुद्ध व अनधिकृत कामे करून खोटा अभिलेख तयार करून संगनमताने लाखो रुपयाचा गैरव्यवहार केल्याचे कागदोपत्री पुराव्यावरून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कारखाना फिल्टर हाऊस येथील विहिरीतील गाळ काढण्याचे जास्तीत जास्त २ ते ३ लाख रुपयांच्या कामाचे तब्बल रु.१८,८५,३१५/- इतक्या रकमेचे देयक नगरपरिषद मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांनी अदा करून शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याबाबत अंबाजोगाई, नगरपरिषदेचे नगरसेवक श्री.शेख रहीम शेख रज्जाक व श्री.सारंग अरुण पुजारी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे संपूर्ण कागदोपत्री पुराव्यासह तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रत्यक्षात कारखाना फिल्टर हाऊस येथील दोन विहिरीतील गाळ या पूर्वी सन २०१६-१७ मध्ये काढण्यात आला होता त्यावेळी साधारणता रु.५,१६,०००/-इतक्या रकमेचे देयक काढण्यात आले असून, सद्य:स्थितीत नगरपरिषदेकडे स्वत:ची जे.सी.बी. असल्यामुळे तसेच ५० फुटापर्यंत पोकलेन भाडे तत्वावर उपलब्ध असतांना या द्वारे गाळ काढला असता तर फक्त २ ते ३ लाख रुपयात काम पूर्ण झाले असते, मात्र यासाठी नवीन ४ विहिरी खोदता येतील एवढ्या मोठ्या प्रमाणत रक्कम अदा करून मोठा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वरील प्रकरणामध्ये नियमानुसार कोणतीही प्रक्रिया न करता स्वत:च्या फायद्यासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, कर्मचारी व नगराध्यक्षा यांनी २ ते ३ लाख रुपयांच्या कामाचे तब्बल रु.१८,८५,३१५/- इतक्या रकमेचे देयक काढून मोठ्या प्रमाणात शासनाच्या रक्कमेचा अनियमितता व गैरव्यवहार केला असल्याचे कागदोपत्री पुराव्यावरून निदर्शनास आल्यामुळे सदर प्रकरणी त्वरित चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय?

(७) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यलय, औरंगाबाद यांच्या दि.०६.०७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती नियुक्ती करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या दि. ०६.०६.२०२२ रोजीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये नमूद कामामध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाली असल्याचे नमूद केले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यलय, औरंगाबाद यांच्या दि.०६.०७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती नियुक्ती करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या दि.०६.०६.२०२२ रोजीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये नमूद कामामध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाली असल्याचे नमूद केले आहे.

(६) हे खरे आहे.

(७) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यलय, औरंगाबाद यांच्या दि.०६.०७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या दि.०६.०६.२०२२ रोजीच्या अहवालानुसार तक्रारीत नमूद कामामध्ये झालेल्या प्रशासकीय व वित्तीय अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन, संबंधितांवर कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अहवाल पाठविला आहे. त्यानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची नावे निश्चित करुन त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून, विभागीय चौकशीचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्यास्तरावर सुरु आहे.

अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषद हद्दीतील प्रभाग.क्र.०१ मधील नालीचे काम केल्याचे दर्शवून शासनाच्या लाखो रुपयांच्या रक्कमेचा गैरव्यवहार केल्याबाबत

(९) ३५७५७ (१७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषद हद्दीतील प्रभाग.क्र.०१ मधील ए.पी.जे. अब्दुल कलाम फंक्शन हॉल समोरील शहा मस्जिद ते जयवंती नदीपर्यंत तीर्थक्षेत्र विकास महमंळामार्फत नाली बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नालीतील फक्त कचरा काढून जुन्याच नालीवर सिमेंटचा थर देऊन नगरपरिषदेच्या आपत्कालीन निधी मधून बोगस व बनावट कामांचे अंदाजपत्रक तयार करुन मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांनी संगनमताने रु.२०,३१,६१४/- इतक्या रकमेची बोगस देयके अदा करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केले असल्याची तक्रार सन २०२९ पासून वारंवार तत्कालीन मुख्याधिकारी तसेच सन २०२० मध्ये अंबाजोगाई, नगरपरिषदेचे नगरसेवक श्री, शेख रहीम शेख रज्जाक व श्री, सारंग अरुण पुजारी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे संपूर्ण कागदोपत्री पुराव्यासह तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रार केली असतांना व वस्तुस्थिती माहित असतांना तत्कालीन मुख्याधिकारी श्री.सरवदे व नगराध्यक्षा सौ.रचना मोदी यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी सदर बोगस कामाचे रु.४,४०,२१९/- व रु.४,३९,८०५/- इतक्या रकमेची दोन देयके अदा केली त्यांतर प्रशासनामार्फत मुख्याधिकारी यापदी श्री.अशोक साबळे यांची नियुक्ती करण्यात आली त्यांना ही सदर कामाच्या तक्रारीची पूर्ण माहिती देऊनही त्यांनीही दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी सदर कामाचे रु.४,७९,७९१/-, रु,४,३१,३७४/- व रु.२,४०,४२५/- इतक्या रकमेची तीन देयके अदा केली असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नाली ही तीर्थ क्षेत्र विकास महमंळामार्फत पूर्वीच बांधण्यात आलेली असून, सदर बोगस कामासाठी नगरपरिषदेच्या आपत्कालीन निधी मधून लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आलेली असल्याने जे अनधिकृत,

बेकायदेशीर व नियमाविरुद्ध असल्याच्या पुराव्याच्या अनुषंगाने शासनाने वरील सर्व प्रकरणाची त्वरित चौकशी करून सर्व संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
सदरील काम पुर्ण झाल्यानंतर कामाच्या स्थितीनुसार व प्रयोगशाळा चाचणी अहवालाच्या अनुषंगाने काम पुर्ण केल्याची खात्री करुन देयके अदा करण्यात आलेली आहेत.
(४) व (५) हे खरे आहे,
सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, बीड यांना अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, सदरचा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

अंबाजोगाई (जिल्हा बीड) या शहरातील अस्वच्छतेबाबत

(१०) ३६४२३ (११-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरात अस्वच्छता प्रचंड वाढली असून तेथील नाले व गटारांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असल्याने नाले व गटारे तुंबल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथे अन्य प्राण्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे साथीचे रोग वाढत असून या प्रकारामुळे तेथील नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून तेथील नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी मागणी स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने अंबाजोगाई शहरातील नागरिकांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) अंबाजोगाई शहरातील नागरिकांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी अंबाजोगाई नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नगर पंचायत पाटोदा (जि. बीड) येथील कनिष्ठ रचनाकार यांना बीड नगरपरिषदेतील कनिष्ठ रचना सहाय्यक या पदाचा अतिरिक्त पदभार आदेश रद्द करणेबाबत

(११) ३६५७१ (०२-०२-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील पाटोदा नगरपंचायतमध्ये कनिष्ठ रचनाकार, श्री.सय्यद सलीम सय्यद याकुब हे कर्तव्य करीत असतांना केलेली गंभीर अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी तसेच सन २०१०-११ व २०१४-१५ या वर्षातील विशेष लेखा परिक्षण अहवालामध्ये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यांत येऊन त्यानुसार त्यांचेविरुध्द या सर्वप्रकरणी विभागीय चौकशी

चालू असतांना त्यांना प्रथम निलंबित व तद्नंतर बडतर्फ करण्याऐवजी त्यांना बीड नगरपंचायतमध्ये अतिरिक्त पदभार सोपविण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कनिष्ठ नगररचनाकार यांना बीड नगरपरिषदेत अतिरिक्त पदभार सोपवितांना "कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास बडतर्फीची कारवाई केली जाईल" असे मा. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे दि. ०४ ऑगस्ट, २०२१ च्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले असतांना, बीड नगरपरिषदेमध्ये देखील त्यांनी अनियमितता करुन शासन निधीचा गैरव्यवहार केला असतांनाही त्यांना बडतर्फ करण्यांत आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार विभागीय चौकशी सुरु असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना अन्य कोणत्याही पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविता येत नसल्याचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यांत आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याप्रकरणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर कनिष्ठ नगररचनाकार यांचेविरुध्द विभागीय चौकशी असल्याने त्यांचा बीड नगरपालिका येथील अतिरिक्त पदभार कमी करुन त्याबाबतचे आदेश रद्द करण्यांत यावेत, अशी त्यांचे दि. २६ ऑगस्ट, २०२१, दि. २१ सप्टेबर, २०२१ व तद्नंतर दि. ५ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, संबंधित कनिष्ठ नगररचनाकार यांना सेवेतून बडतर्फ करण्याऐवजी शासनाच्या दि. २४ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये शासनाने त्याप्रकरणी स्थगिती दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(६) असल्यास, संबंधित कनिष्ठ नगररचनाकार यांचेविरुध्दच्या आदेशास शासनाने स्थगिती देण्याची कारणे काय आहेत, ही स्थगिती उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यांत येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) सदर प्रकरणी विभागीय चौकशी सुरु असल्याची बाब खरी आहे.
नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि.१७ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.सय्यद सलीम सय्यद याकुब, कनिष्ठ रचना सहाय्यक, पाटोदा नगरपंचायत यांच्याकडे बीड नगरपरिषद मध्ये अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला होता.
(२) श्री.सय्यद सलीम सय्यद याकुब, कनिष्ठ रचना सहाय्यक, पाटोदा नगरपंचायत यांच्याकडे बीड नगरपरिषदेमध्ये देण्यात आलेला अतिरिक्त पदभार जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि. ०४ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे, हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) अंशतः हे खरे आहे.
श्री.सय्यद सलीम सय्यद याकुब, कनिष्ठ रचना सहाय्यक, पाटोदा नगरपंचायत यांच्याकडे बीड नगरपरिषदेमध्ये अतिरिक्त पदभार देण्याबाबतच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि. २३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशास नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि. २८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे.
(६) श्री.सय्यद सलीम सय्यद याकुब, कनिष्ठ रचना सहाय्यक, पाटोदा नगरपंचायत यांच्याविरुद्ध उपविभागीय अधिकारी, बीड यांच्यामार्फत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे. तथापि, श्री. सय्यद सलिम यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे मुळ अर्ज दाखल केला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

मोरा कोळीवाडा मच्छिमार सहकारी सोसायटीच्या प्रलंबित प्रश्नाबाबत

(१२) ३६६४३ (०२-०२-२०२२). श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावा-शिवडी प्रकल्प बाधितांकरिता मोरा कोळिवाडा मच्छिमार सहकारी सोसायटीने ४१५ प्रकल्प बाधितांची यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयात सादर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियम व अटी नुसार पात्र लाभार्थींच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली होती. तसेच अपात्र ठरलेल्या बांधवांची यादी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे संस्थेने पाठवली असून संस्थेने नियमांची पुर्तता करून ती यादी पुन्हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठवली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेने सादर केलेली यादी मंजूर न करता इतर यादी प्रकल्प बाधीत म्हणून मंजूर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहाय्यक मत्स्य आयुक्त यांनी सर्व बायोकार्ड मच्छिमार कार्ड मासेमारी व्यवसायाकरिता आहेत याच उद्देशाने दिलेले असताना सुध्दा तीन प्रकारे बायोमेट्रीक कार्ड बाधित प्रस्तावात घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहे नोव्हेंबर २०१८ रोजी प्रस्तावाची अंतिम तारीख जाहीर केलेली असताना माहे जुलै, २०२० मध्ये मोरा कोळीवाडा येथील बाहेरील संस्थेचे नवीन प्रस्ताव स्विकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, २१३ सी ३ मधील ११ बाधीत मच्छिमारांचे आधार कार्ड व नावात बदल करून सुधारीत प्रस्ताव सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय रायगड अलिबाग यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला कळवून सुध्दा त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, सदर प्रकरणी मोरा कोळीवाडा मच्छिमार सहकारी सोसायटीच्या प्रलंबित प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१), (२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे मोरा कोळीवाडा मच्छिमार सहकारी सोसायटीमार्फत नुकसान भरपाईकरिता एकूण ४७३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्राप्त अर्जांपैकी ३२६ अर्ज पात्र ठरले आहेत. पैकी २७८ लाभार्थ्यांना नुकसान भरपाईचा पहिला हप्ता देण्यात आला असून ४८ लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात कार्यवाही सुरू आहे. उर्वरित अर्जांपैकी दस्तऐवजांची पुर्तता केली नसल्याने प्रतिक्षायादीत ठेवण्यात आलेल्या अर्जांपैकी आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता केलेल्या ३७ अर्जांना मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित ११० अर्जांचे दस्तऐवज अद्याप अपूर्ण असल्याने सदर अर्ज प्रतिक्षा यादीत ठेवण्यात आले आहेत.

(४) मच्छीमार पात्रता प्रमाणीकरण समिती (FEVC) च्या निर्णयानुसार नुकसान भरपाईकरीता C३ श्रेणीसाठी पारंपारिक मच्छीमार (TF) कार्ड व C२ श्रेणीसाठी बोट मालक (BO) श्रेणीचे बायोमेट्रिक ओळखपत्र आणि बोटीची वैध कागदपत्रे नुकसान भरपाईसाठी ग्राह्य धरली जातात.

तथापि जहाज चालक दल (VC), सहायक कामगार (AW) आणि कॅज्युअल लेबर (CL) म्हणून नमूद केलेल्या श्रेणीचे बायोमेट्रिक ओळखपत्रधारक पगारी कामगार म्हणून बोटीवर काम बोटीवर काम करीत असल्याने अशा कामगारांना मत्स्यव्यवसायिक म्हणून नुकसान भरपाई लाभासाठी या बायोमेट्रीक ओळखपत्रधारकांचा विचार केला जात नाही.

(५) हे खरे नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २०.११.२०१९ होती. या अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांपैकी कोणताही अर्ज मंजूर करण्यात आलेला नाही.

(६) हे खरे नाही.

सदर ११ अर्जदारांच्या सुधारीत प्राप्त अर्जानुसार त्यांना नुकसान भरपाईचा पहिला हप्ता देण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्ह्यात आदिवासी विकास विभागांतर्गतअसलेले बांधकाम विभागाचे कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबत

(१३) ३६८१८ (१२-०१-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात आदिवासी विकास विभागांतर्गत असलेले बांधकाम विभागाचे कार्यालय नाशिक येथे स्थलांतरीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालय धुळे जिल्ह्यातून इतरत्र स्थलांतरीत करण्यात येवू नये अशी मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बांधकाम विभागाचे कार्यालय धुळे जिल्ह्यातुन स्थलांतरीत करण्यात येवु नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२७-०९-२०२२) : (१)होय हे खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दि.२३/०९/२०२१ अन्वये सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, धुळे हे कार्यालय नाशिक येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(२) आदिवासी विकास विभागांतर्गत असलेले बांधकाम विभागाचे कार्यालय धुळे जिल्ह्यातून इतरत्र स्थलांतरीत करण्यात येवू नये अशी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(३)प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मिरा-भाईंदर मेट्रो-९ ही दहिसर (पूर्व) ते भाईंदरपर्यंत जाणार असल्याने या मार्गिकेसाठी कारशेड भाईंदर येथे उभारण्याबाबत

(१४) ३७८११ (०९-०५-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसर येथील प्रस्तावित कारशेड आता ठाणे जिल्हयातील भाईंदरच्या राई-मुर्धे गावात आणि कोनी येथील कारशेड कशेळी गावात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो कारशेडची जागा वारंवार बदल्यामुळे किंवा आधी कोणती शेड उभारावी, याबाबत पहिल्या टप्प्यांतील मेट्रो मार्गांचे अंतरासाठी कोणते ठिकाण हे सोयीचे ठरेल याचे कारण देण्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करुन तसेच अनेक अधिकाऱ्यांनी निर्णय घेऊनच या सर्व मेट्रो मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल जागतिक स्तरावरील संस्थांकडून तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अचानक कारशेडची जागा बदल्याने मेट्रोच्या विकासास अडथळे निर्माण होत असून सविस्तर प्रकल्प अहवालातून कोणता मार्ग, किती अंतराचा टप्पा आधी पूर्ण होईल हे माहिती असतांना देखील मेट्रो मार्ग व कारशेडला अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई महानगरातील प्रलंबित मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
मुंबई मेट्रो मार्ग-५ करीता प्रस्तावित असलेल्या कोनगाव (एमआयडिसी) येथील मेट्रो कारशेड भिवंडी तालुक्यातील कशेळी येथे आणि मेट्रो मार्ग-७ करीता प्रस्तावित असलेल्या दहिसर येथील मेट्रो कारडेपो वगळून, मेट्रो मार्ग-९ च्या संरेखनात अंशत: बदल करुन राई मुर्धे येथील उपलब्ध असलेल्या अतिरिक्त जागेवर मेट्रो मार्ग - ७, ७अ व ९ साठी मेट्रो कारशेड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२), (३) व (४) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना कारशेडची जागा प्राथमिक स्वरुपात अंतिम करण्यात येते ज्यात जागेची किंमत आणि प्रकल्प सुलभता या बाबी लक्षात घेतल्या जातात. तथापि प्रकल्प राबविताना काही ठिकाणी स्थानिकांचा विरोध, सीआरझेड, वन विभागाच्या परवानग्या, मिठागरे वा अन्य काही अपरिहार्य कारणांमुळे कारशेडची जागा बदलणे क्रमप्राप्त होते.
तथापि मेट्रो मार्ग-७ च्या परिचलन व संचालनासाठी तात्पुरत्या स्वरुपात मेट्रो मार्ग २अ साठी बांधण्यात आलेला चारकोप डेपो वापरण्यात येणार असल्याने मेट्रो प्रकल्पाचे काम रखडलेले नाही. तसेच उर्वरित मेट्रो प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान उदभवणाऱ्या विविध समस्या सोडवण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

मिरा-भाईंदर मेट्रो-९ ही दहिसर (पूर्व) ते भाईंदरपर्यंत जाणार असल्याने या मार्गिकेसाठी कारशेड भाईंदर येथे उभारण्याबाबत

(१५) ३८२३१ (०९-०५-२०२२). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईदर मेट्रो-९ ही दहिसर (पूर्व) ते भाईदरपर्यंत जाणार असल्याने या मार्गिकेसाठी भाईंदर येथे कारशेड उभारण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाईदरच्या मुर्धा व राई दरम्यानची सुमारे ३२ हेक्टर इतकी जागा एमएमआरडीएने प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास या कारशेडकरिता संपादित करावयाच्या जागेसाठी स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कारशेड उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) मुंबई मेट्रो मार्गिका क्र. ७ साठी आवश्यक असणाऱ्या कारडेपोसाठी जागा उपलब्ध करण्यास अडचणी निर्माण झाल्याने तसेच मेट्रो मार्ग-९ व ७-अ या मार्गिका क्र. ७ चा विस्तार असल्याने मेट्रो मार्ग-९ व ७-अ च्या संरेखनात अंशत: बदल करुन राई-मुर्धे येथे एकूण ३२ हेक्टर क्षेत्रफळामध्ये मार्गिका क्रमांक-७, ७-अ व ९ या तिन्ही मार्गिकांसाठी एकत्रित कारडेपो उभारण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. यानुषंगाने सदर जागेच्या वापर बदलाबाबत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला असून सद्यस्थितीत सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

अहमदपूर (जि.लातूर) शहरातील नगरपालिकेच्या भाजी मंडईत शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(१६) ३८२७१ (२०-०४-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरातील नगरपालिकेच्या भाजी मंडईत ग्रामीण भागातील शेतकरी भाजीपाला विक्रीस मोठया प्रमाणात घेऊन येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंडईत शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीसाठी जागा मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना रस्त्यावर बसून भाजीपाल्याची विक्री करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना व भाजी विक्रेत्यांना भाजी मंडईत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) अहमदपूर शहरातील भाजी मंडई येथे उपलब्ध असलेले सर्व ३२ ओटे भाजी विक्रेत्यांना भाड्याने देण्यात आलेले आहेत. भाजी मंडईमध्ये एकही गाळा शिल्लक नसल्याने, शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीकरीता सद्यःस्थितीत जिल्हा परिषदेच्या मैदानावर तात्पुरती जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तथापि, शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीकरीता कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदपूर (जि.लातूर) शहरातील मुख्य रस्ता व नगरपालिकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असल्याने पार्किंगची सोय होण्याबाबत

(१७) ३८२७३ (२०-०४-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहरातील कॉलेज रोड, थोडगा रोड, गावात जाणारा मुख्य रस्ता व नगरपालिकाकडे जाण्यासाठी शिवाजी चौकातून जाणाऱ्या रस्त्यावर मुख्य बाजारपेठेत एका ठिकाणी दररोज वाहतूककोंडी होत असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर पार्किंगची शिस्त नसून मोठया प्रमाणात वर्दळ सुरु असून जागोजागी गाडया पार्क करुन ठेवल्यामुळे नागरीकांची जाण्या-येण्यास गैरसोय निर्माण झाली असल्याने स्थानिक नागरीकांत असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी पार्किंगची सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

अहमदपूर शहराच्या विकास आराखड्यामधील सर्व्हे क्र. १३०, आरक्षण क्र.५५ येथे पार्किंगची व्यवस्था करण्याबाबतची कार्यवाही अहमदपूर नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदपूर (जि.लातूर) शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

(१८) ३८२७५ (२०-०४-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि.लातूर) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या लिंबोटी तलावात मुबलक पाणीसाठा असूनही पाणीपुरवठा करणाऱ्या विदयुत पंपांची दुरुस्ती अभावी तेथील नागरीकांना १५ ते २० दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहराला पाणीपुरवठा नियमित होत नसल्यामुळे तेथील नागरीकांना पाण्याचे टँकर लावून पाणी विकत घ्यावे लागत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पंपांची त्वरीत दुरुस्ती करुन तेथील नागरीकांना नियमित पुरेसा पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) अंशतः खरे आहे.

अहमदपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या लिंबोटी पंपगृहातील ३०० अश्वशक्ती (एच.पी.) क्षमतेच्या ३ व्ही.टी. पंपांपैकी २ विद्युत पंप एकाच वेळी खराब झाले होते. त्यामुळे लिंबोटी येथील ३०० अश्वशक्ती क्षमतेचा १ राखीव व्ही.टी. पंप व थोडगा येथील ६० अश्वशक्ती क्षमतेचा १ व्ही.टी. पंप अशा २ विद्युत पंपाद्वारे अहमदपूर शहरास १० ते १२ दिवसाआड एकवेळ पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच आवश्यकतेनुसार नगरपरिषदेमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) नादुरुस्त झालेले दोन्ही विद्युत पंप दुरुस्त करुन, त्यापैकी १ पंप दि. २०.०१.२०२२ रोजी लिंबोटी पंपगृहात बसविण्यात आला असून, उर्वरित १ पंप सुरु करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

सद्यस्थितीत अहमदपूर शहरास ६ ते ८ दिवसाआड एकवेळ सुरळीतपणे पाणीपुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील लोहगाव विमानतळानजिकच्या क्षेत्रात बेकायदेशीर प्लॉटींग करुन विक्री केल्याबाबत

(१९) ३९७४६ (१९-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील लोहगाव विमानतळा पासून १०० ते ९०० मीटर अंतरापर्यंत क्षेत्रास प्रतिबंध क्षेत्र (ना-विकास क्षेत्र) म्हणून घोषित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ना-विकास क्षेत्राच्या परिसरात नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन
बेकायदेशीर प्लॉटींग करून विक्री होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने बेकायदेशीरपणे प्लॉटींग करून विक्री करणाऱ्या व आर्थिक फसवणूक केल्याबद्दल संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) पुणे महानगरपालिकेची सुधारित विकास योजना दि.०५.०१.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर आहे तर एअर फोर्स स्टेशन लोहगांव यांचे पत्र क्र.२W/२९०१/८४६/Wks, दि.१२.०१.२०१६ नुसार लोहगाव विमानतळापासून १०० ते ९०० मी. क्षेत्र प्रतिबंधीत घोषित करण्यात आले आहे.

(२) नाही, अशी बाब शासनाच्या निर्दशनात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

(४) प्रश्न उद्धवत नाही.

सांगली जिल्हयातील जत तालुका व आसपासच्या परिसरात मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याबाबत

(२०) ३९८१३ (१८-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील जत तालुका व आसपासच्या परिसरात मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने वाढत्या प्रदुषणामुळे मानवी जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे हे लक्षात घेता जत येथील दुय्यम निबंधक कार्यलयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयात व राज्यात मोठया प्रमाणावर वृक्षारोपण करुन वाढते प्रदुषण रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-१०-२०२२) :१) सांगली जिल्हयात जत तालुक्यामध्ये मागील ३ वर्षामध्ये अवैध वृक्षतोडीच्या ३ घटना घडलेल्या असुन त्यात १९ वृक्षांची तोड झालेली आहे. या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

दुय्यम निबंधक श्रेणी-१,जत कार्यालयाच्या परिसरात डिसेंबर २०२१ मध्ये वृक्षरोपण करण्यात आले आहे.
(२) सांगली वनविभागांतर्गत वन क्षेत्रावर सन २०२१-२२ मध्ये २.९० लक्ष इतकी वृक्षलागवड झालेली आहे. तसेच राज्यात सन २०१७ ते २०१९ या कालावधीत वन विभाग, ग्रामपंचायत व इतर विभाग यांच्या माध्यमातून ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही .

वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या मेट्रो-४ च्या मार्गाच्या कामातील पाचपैकी (पॅकेज) तीन टप्प्यांतील काम संथगतीने सुरु असल्याबाबत

(२१) ४००२६ (१८-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या मेट्रो-४ च्या मार्गाच्या कामातील पाचपैकी (पॅकेज) तीन टप्प्यांत काम संथगतीने सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गातील तिन्ही टप्प्यातील कामाचा वेग वाढविण्याचे आदेश देऊनही कामाचा वेग वाढत नसल्याने एमएमआरडीने कंत्राटदारांना नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोटीसीनंतरही या तीन टप्प्यातील कामांचा वेग न वाढल्यास हे काम विहित मुदतीत पूर्ण होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विहित मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराकडून हे काम काढून अन्य कंपनीला सोपविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) ४) व (५) कंत्राटदाराने कामाची अपेक्षित प्रगती न ठेवल्यामुळे कामांची गती वाढविणे व त्यासाठी लागणारी सर्व साधने वाढविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत सल्लागारामार्फत वेळोवेळी सुचना देण्यात आल्या. तसेच दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत जर कंत्राटदाराने काम अपेक्षित वेगाने पुर्वपदावर न आणल्यास कंत्राटातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले.

त्यानुषंगाने कंत्राटदाराने उर्वरित तिन्ही पॅकेजच्या कामांकरिता सक्षम उपकंत्राटदाराच्या नियुक्तीचा प्रस्ताव प्राधिकरणासमोर मांडला होता. सदर प्रस्तावाची योग्य ती छाननी करण्यात आली व त्यानुसार उपकंत्राटदाराच्या नियुक्ती करिता सक्षम प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात आली आहे व मेट्रो मार्ग -४ च्या सदर तिन्ही पॅकेजेस करिता पूरक करार पॅकेज ८ व १० साठी दिनांक २६ मे २०२२ रोजी आणि पॅकेज १२ साठी १० मे रोजी पूरक करार करण्यात आला आहे. उपकंत्राटदाराला आवश्यक असणारी साधनसामुग्री, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ तैनात करुन मेट्रोचे काम पुर्वपदावर आणण्याकरिता प्राधिकरणामार्फत सुचना देण्यात आल्या आहेत.

त्यास अनुसरुन उपकंत्राटदाराकडून तिन्ही पॅकेजेस मध्ये बांधकामास पुन्हा सुरुवात करण्यात आली आहे. तसेच कंत्राटदाराने वाढीव बांधकाम कालावधीचा प्रस्ताव सादर केला आहे. एमएमआरडीएमार्फत प्रस्तावाची छाननी करण्यात येऊन योग्य तो वाढीव कालावधी मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबईमधील कांजूरमार्ग (पुर्व) येथे प्रकल्प बाधितांसाठी बांधलेल्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(२२) ४००२७ (३१-०३-२०२२). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील कांजूरमार्ग (पुर्व) येथे प्रकल्प बाधितांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेल्या इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे आणि नियमांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय समिती किंबहूना बांधकाम क्षेत्रातील तज्ञाच्या समिती मार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निकृष्ट बांधकामासाठी उच्चस्तरीय समिती किंबहूना बांधकाम तंज्ञाच्या समितीमार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विषयांकीत पुनर्वसन इमारतींच्या संरचना संकल्पचित्राची (Structural Design) तपासणी (Proof Checking) हि त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच इमारतीच्या बांधकामाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार विकासकांकडून नियुक्त केलेले बांधकाम पर्यवेक्षक आणि संरचना सल्लागार यांच्याकडून वेळोवेळी स्थळ पाहणी होत असते.

सदर योजनेतील इमारत क्रमांक P-३ ची विना विनाशकारी चाचणी (NDT) ही इमारतीच्या विकासकामार्फत मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. वापकॉस व प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेली असून सदरची चाचणी हि स्ट्रक्चरल ऑडीटचाच एक भाग आहे. सदरहू चाचणीच्या अहवालानुसार सदर इमारत संकल्पित आयुष्यासाठी संरचनात्मकदृष्ट्या स्थिर असल्याचे नमूद केले आहे.

तसेच, प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाकडून V.J.T.I या संस्थेमार्फत इमारत क्र. P-१, P-२ व P-३ चे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. V.J.T.I. ने सादर केलेल्या अहवालानुसार, सदर इमारती ह्या संरचनात्मकदृष्ट्या स्थिर (Structure in good condition) आहेत. तथापि सदर इमारतींची काही अंतर्गत दुरुस्तीची कामे व नियमित देखभाल करण्याबाबत सुचिविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सदर कामे, प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाच्या निगराणीखाली करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाद्वारे सदर इमारतींच्या विकासकास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर नगरपंचायत (जि.जळगांव) मधील तत्कालिन ग्रामपंचायत काळात लागलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवेत समावेश करण्याबाबत

(२३) ४०२०३ (१९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) नगरपंचायत मधील तत्कालिन ग्रामपंचायत काळात लागलेले कर्मचारी सर्वश्री भगवान वंजारी, सचिन काठाके, गजानन सुरंगे यांचा समावेश करण्यात आले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु कर्मचाऱ्यांनी दिलेल्या प्रदीर्घ सेवेचा विचार करता समावेश करताना तत्संबंधीच्या अटी शिथील करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास संचालक, नगरपरिषद प्रशासन, संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांना सेवेत समावेश करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी मुक्ताईनगर नगरपंचायत मधील ग्रामपंचायत कालीन कर्मचारी यांचे समावेशन करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केला आहे. या प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील ईस्टन फ्रिवेचा ठाण्यापर्यंत विस्तार करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

(२४) ४०२७६ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ईस्टन फ्रिवेचा ठाण्यापर्यंत विस्तार करण्याचा निर्णय एमएमआरडीएच्या संचालक मंडळाच्या दि.१६ जानेवारी २०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पाला केव्हापासून सुरु करण्यात येऊन सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या १५१ व्या बैठकीत पूर्व मुक्त मार्गाचा ठाण्यापर्यंत विस्तार करण्याच्या प्रस्तावाची सुसाध्यता तपासण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूकीचा सर्वकष अभ्यास करण्याच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या मे. ली असोसिएट दक्षिण एशिया प्रा.लि. दिल्ली या सल्लागार संस्थेने या कामाचा अंजाजित खर्च रु. ३१४८ कोटी इतका होणार असल्याचे ढोबळ मानाने नमूद केले आहे.

(३) सदर प्रकल्पाची सुसाध्यता तपासणे व पूर्व निविदा प्रक्रीया करणेकरीता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, सल्लागारामार्फत अस्तित्वातील व भविष्यातील येणाऱ्या विविध प्रकल्पांचा अभ्यास करुन सुसाध्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुखेड (जि.नांदेड) शहरातील अहिल्यादेवी होळकर नगर व गौसीया मस्जिद भागात सीसी रोड व पाण्याची पाईपलाईन करण्याबाबत..

(२५) ४०३०० (२७-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) शहरातील अहिल्यादेवी होळकर नगर व गौसीया मस्जिद भागात सीसी रोड व पाण्याची पाईपलाईन करण्यात यावी यासाठी स्थानिक संघटनेने तहसिल कार्यालयासमोर दि.२४ जानेवारी, २०२२ रोजीपासून उपोषण सुरु केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधी माहिती घेऊन उपरोक्त भागातील नागरी समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

तथापि, स्थानिक संघटनेच्या निवेदनात नमूद रस्ता, पूल व शौचालयाची कामे सर्वसाधारण सभेत ठेवून कार्यवाही करण्यात येईल, असे मुखेड नगरपरिषदेने लेखी पत्र दिल्यानंतर संबंधितांनी उपोषण मागे घेतले आहे.

(२) मुखेड नगरपरिषदेमार्फत अहिल्याबाई नगर व फुले नगर यासाठी पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक तयार केले असून, त्यामध्ये पाण्याची टाकी (GSR) बांधणे, तसेच पाईपलाईन टाकण्याच्या कामास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

तसेच नगरपरिषद सर्वसाधारण सभा दि.०९ फेब्रुवारी, २०२२, ठराव क्र.३३ अन्वये अहिल्याबाई होळकर नगर, गौसिया मस्जिद भागात नवीन पाईपलाईन टाकणे, रस्ते, नाली व पुलाच्या कामास मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात वन परिक्षेत्रात वृक्षांची विनापरवाना कत्तल होत असल्याबाबत

(२६) ४०६९७ (१८-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात वन परिक्षेत्रातील पाथर्डी, वडगाव, महातोली, उचेगाव, करसगाव, धामणगाव, बोदेगाव, कुंभारकिन्ही, मागकिन्ही, बोथ, पळशी, लाख इत्यादी बिटमध्ये आंबा, निंब, काटसावर, बाभूळ, अजन आदी वृक्षांची कत्तल केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याच्या शेतातील आडजात वृक्ष तोडण्यासाठी वनविभागाची परवानगी असणे गरजेचे असतांना सुध्दा मात्र, ठेकेदार परवानगी न काढता अवैध वृक्ष तोड करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्षतोडी संदर्भात वन व महसूल अधिनियमानुसार काही नियम घालून दिले असतांना सदर प्रकार बिटमधील संबंधित क्षेत्र सहाय्यकांना माहित असूनही कोणतीच कारवाई होत नसल्याने अधिकाऱ्यांसोबत लाकूड तस्करांचे हितसंबंध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तब्बल ५ ते ६ महिन्यांपासून लाकूड तस्करांनी शेतकऱ्यांच्या नावावर ई-क्लास, वन परिक्षेत्रातील वृक्षांची कत्तल केल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-१०-२०२२) : (१) दारव्हा वन परिक्षत्रातील पाथर्डी, वडगाव, महातोली, उचेगाव, करसगाव, धामणगाव, बोदेगाव, कुंभारकिन्ही, मागकिन्ही, बोथ, पळशी, लाख इत्यादी बिटामध्ये आबां,निंब,काटसावर, बाभूळ, अजन अशा वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०२१-२२ मध्ये १३ शेतकऱ्यांना एकूण ४४८ वृक्ष तोडण्याची महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ अंतर्गत वन विभागाची परवानगी देण्यात आली आहे.

(३) दारव्हा वन परिक्षेत्रामार्फत महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ अंतर्गत अवैध वृक्षतोड प्रकरणामध्ये वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे बिट मधील क्षेत्रसहायक व अधिकारी यांच्यासोबत लाकूड तस्करांचे हितसंबध असल्याचे आढळून आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) दारव्हा वनपरिक्षेत्रातील तसेच खाजगीक्षेत्रातील वृक्षांची अवैध रित्या तोड होऊ नये याकरीता परिमंडळ स्तरावर वनपाल, नियतक्षेत्रस्तरावर वनरक्षक आणि परिक्षेत्रस्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी दक्षता घेतली जाते. तसेच वनविभागामार्फत नियमितपणे गस्त घातली जाते. तपासणी व गस्ती दरम्यान वनक्षेत्रावर अवैध वृक्षतोड आढळून आल्यास भारतीय वन अधिनियम १९२७ नियमाप्रमाणे प्राथमिक वनगुन्हा जारी करुन चौकशी केली जाते. तसेच खाजगी क्षेत्रावर अवैध वृक्षतोड प्रकरणी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ अंतर्गत कारवाई केली जाते. त्यास अनुसरुन सन २०२१-२२ मध्ये एकूण ६ अवैध वृक्षतोड प्रकरणात कार्यवाही करण्यात आली.

भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात असलेल्या गोदामांमध्ये वारंवार लागलेल्या आगीबाबत

(२७) ४०७३६ (२०-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात असलेल्या गोदामांमध्ये वारंवार आगी लागण्याच्या प्रमाणात खुप वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विषयाबाबत स्थानिक प्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना याबाबत सविस्तर कथन करून भिवंडी (ग्रा.) करिता स्वतंत्र्य अग्निशमन केंद्राची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर गोदामांचे "अग्निशमन ऑडिट" करावयाच्या सूचना संबंधितांना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी गोदामांना आगी लागण्यापासून वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) होय, हे खरे आहे,

(२) सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २२.१२.२०१५ रोजी अशा विषयाशी साधर्म्य असलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) शासनाने, शासकीय /निमशासकीय /सार्वजनिक उपक्रमांच्या फायर ऑडीट करण्याबाबत दिनांक २२.०६.२०१२ व दिनांक २५.१२.२०१२ अन्वये परिपत्रकाव्दारे सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) भिवंडी (ग्रामीण) परिसरात असलेल्या व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात समावेश असलेल्या ६० गावांसाठी अग्निशमन केंद्र विकसित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु आहे.

भिवंडी (ग्रामीण) परिसरात आग लागल्यास जवळ असलेल्या भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, ठाणे या महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवा तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंबरनाथ अग्निशमन सेवांकडून तसेच ठाणे आपत्ती प्रतिसादर दल (टीडीआरएफ) मार्फत या भागात तात्काळ अग्निशमन सेवा पुरविली जाते.

तुळजापुर (जि.उस्मानाबाद) शहरातील बंद सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

(२८) ४१०५० (०९-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापुर (जि.उस्माबनाबाद) शहरातील सिग्नल व्यवस्था मागील अनेक वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापुर शहरात महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनास राज्यातून तसेच परराज्याततून येणाऱ्या भावीकांची संख्या, ही लाखो प्रमाणात असते यामुळे अनेक वर्षांपासून वाहतुकीस शिस्त, वेगमर्यादा, नियंत्रण लावण्यासाठी शहरामध्ये प्रमुख ठिकाणी लाखो रुपये खर्चुन शासनाकडून सिग्नल बसविण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बंद असलेले सिग्नल त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) तुळजापूर शहरातील नादुरुस्त सिग्नल दुरुस्त करण्याच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन, सिग्नल यंत्रणा सुरु करण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मंजूर भिवंडी बायपास प्रकल्पाचे (जि.ठाणे) काम अद्याप प्रलंबित असल्याबाबत.

(२९) ४११७१ (२५-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडीतील विश्व भारती फाटा, स्टेट हायवे ७६ ते स्टेट हायवे-८४ भिनार ते निंबवली असे ७.७० कि.मी. लांबीचे क्षेत्रफळाच्या भिवंडी बायपास महामार्गाच्या कामास विभागामार्फत मंजुरी देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीतील विश्व भारती फाटा, स्टेट हायवे ७६ ते स्टेट हायवे-८४ भिनार ते निंबवली असे ७.७० कि.मी. लांबीचे क्षेत्रफळाच्या भिवंडी बायपास महामार्गाचे काम अद्यापपर्यंत प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास भिवंडीतील वाहतूक कोंडीमुळे भिवंडी बायपास प्रकल्पास मंजुरी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सा.उ.वगळून) तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

तथापि भिवंडीतील विश्वभारती फाटा ते भिनार भिवंडी बायपास रस्त्याच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूरी देण्यात आली आहे.

४) व ५) दि. २५ मे, २०२१ रोजी मा. मंत्री, नगर विकास विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.उ) यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत मनोर ते वाडा ते भिवंडी या खाजगीकरणांतर्गत मंजूर रस्त्यामधील विश्वभारती फाटा ते भिनार वडपे या बाह्य वळण रस्त्याच्या भागाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून सदरहू कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

मेट्रो मार्ग – ५ (ठाणे –भिवंडी- कल्याण) शासनामार्फत या प्रकल्पाची निर्मितीस विलंब होत असल्याबाबत

(३०) ४११७४ (१८-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत मेट्रो-५ ठाणे-भिवंडी-कल्याण लाइन मंजुर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत मेट्रो-५ ठाणे-भिवंडी-कल्याण लाइन ही मुंबई शहरातील मेट्रो प्रणालीचा एक भाग असून भिवंडीतील काही दुकानदार, रहिवासी व राजकीय निषेधामुळे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाद्वारे मेट्रो ५ प्रकल्पाच्या वैकल्पिक / पर्यायी मार्गीकेची व्यवहार्यता तपासण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कोर्पोरेशन लि. यांच्याकडे दिनांक ५ मे, २०२० मध्ये वर्ग करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिल्ली मेट्रो कोर्पोरेशन लि. द्वारे पर्यायी मार्गीकेची संपूर्ण व्यवहार्यता तपासून दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी उत्तरे देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मेट्रो ५ प्रकल्प अंमलबजावणीसाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. द्वारे सुचविण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या बैठकीमध्ये दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकेमध्ये वंजारपट्टी नाका, खडकपाडा, बिर्ला कॉलेज, शहाड आणि उल्हासनगर या क्षेत्रांचा समावेश करून मार्गिका संरेखनाचे पुनर्विलोकन करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यास अनुलक्षून मेट्रो मार्ग - ५ च्या संरेखनातील प्रस्तावित बदलाची सुसाध्यता तपासून सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी सुसाध्यता अहवाल सादर केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या स्तरावर छाननी करुन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास भिवंडीतील (प्रकल्प बाधित रचना) अतिक्रमण हटविताना नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(३१) ४११७५ (२५-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण द्वारे निरनिराळे प्रकल्प राबविण्यात येत असून, मुंबईमधील (प्रकल्प बाधित रचना) अतिक्रमण हटविताना नागरिकांना नुकसान भरपाई दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई महानगर क्षेत्रामध्ये प्रकल्प बाधित रचना अतिक्रमण हटवण्याकरिता एकच धोरण आखणार आहे काय,

(३) असल्यास सदर धोरण भिवंडी शहरात लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) (२), (३) व (४)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विविध प्रकल्प राबविण्यात येत असून, प्रकल्पाने बाधित केवळ पात्र प्रकल्पग्रस्तांचेच पुनर्वसन शासनाच्या प्रचलित पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण प्राधिकरणाकडून करण्यात येते. प्रकल्पग्रस्तांचे प्रकल्पाने बाधित बांधकाम हटविताना अपात्र प्रकल्पग्रस्तांना कोणतीही नुकसान भरपाई प्राधिकरणामार्फत देण्यात येत नाही. तसेच केवळ प्रकल्पाने बाधित बांधकामांचे निष्कासन प्राधिकरणामार्फत करण्यात येते.

सदरहू धोरण भिवंडी शहरातील प्राधिकरणाच्या प्रकल्पांमुळे बाधीत प्रकल्पग्रस्तांना लागू राहिल. तथापि, प्राधिकरणाच्या कोणत्याही प्रकल्पाने प्रत्यक्ष बाधित नसलेल्या व अतिक्रमणधारकांना पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण लागू राहणार नाही.

भोर नगरपरिषद (ता.भोर, जि.पुणे) येथे नाटयगृह व त्याच्या भूसंपादनाकरीता निधी मिळणेबाबत

(३२) ४१२०३ (१८-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर नगरपरिषद (ता.भोर, जि.पुणे) ही 'क' वर्ग दर्जाची नगरपरिषद असून या नगरपरिषदेच्या हद्दीमधील सि.स.नं. ८२९ व ८५८ येथे नाट्यगृह अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर नाट्यगृहासाठी अंदाजे रु.५ कोटी निधीची आवश्यकता असून प्रस्तावित नाट्यगृहासाठी जागा भूसंपादनासाठी रु.४ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावित बाबींवर शासनाने निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२२) : (१) भोर नगरपरिषद क्षेत्रात सि.सि.नं.८२९ (भाग) सि.सि.नं.८५८ (भाग) या भूखंडावर ऑडिटोरियम हे आरक्षण दर्शविलेले असून सदर आरक्षण संपादन करणेसाठी नगरपरिषदेने ठराव केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भुसंपादनाचा खर्च नगरपरिषदेने स्वनिधितून भागविणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट गावे विकासाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत तसेच कर आकारणी संदर्भात

(३३) ४१५५४ (२५-०४-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांचा प्रारुप विकास आराखडा अद्याप तयार झाला नसल्याचे दि.३१ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे विकास आराखडा तयार होण्यास आणि त्याला मान्यता मिळण्यास एवढा मोठा कालावधी जात असेल तर या गावांमधील विकास प्रक्रियेला सुरुवात कधी होणार असा प्रश्न निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या गावांचा प्रारुप विकास आराखडा तातडीने तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सन २०२४ पर्यंत उक्त समाविष्ठ गावांची मा.मंत्रीमहोदयाच्या घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामपंचयाती प्रमाणे कर आकारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) होय.

सदर ११ गावांचा विकास आराखडा तयार करणेबाबत कार्यवाही करण्यास पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेचा ठराव क्र.८७४, दि.२१.१२.२०१७ नुसार मान्यता मिळाली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ नुसार इरादा जाहिर करण्यात आला असून तो महाराष्ट्र शासन राजपत्रात व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच कलम २४ नुसार नगर नियोजन अधिकारी यांची नियुक्ती करण्यास मान्यता मिळाली आहे.

(२) शासन निर्णय दि.०४.१०.२०१७ नुसार पुणे महानगरपालिकेत २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गांवामधील विकास कामांसाठी (उदा. रस्ते, पाणीपुरावठा, मलनि:स्सारण इ.)
अंदाजपत्रकीय तरतूदी करण्यात आल्या आहेत. सद्या सदर ११ गावांसाठी प्रारुप विकास आराखडा तयार होवून त्यास मंजूरी मिळेपर्यंत, पुणे जिल्ह्याच्या मंजूर प्रादेशिक आराखड्यानुसार व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार बांधकाम विकसन सुरु आहे. त्यामुळे या गावांमधील विकास प्रक्रिया कधी सुरु होणार असा प्रश्न निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर ११ गावांतील लोकसंख्या वाढ, सामजिक व आर्थिक परिस्थिती, घरांकरीताची परिस्थिती, मागणी, प्रक्षेपित लोकसंख्या यांचा विचार करुन झोनिंग, आरक्षणे, रस्ते यांचा प्रस्तावित वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये याविषयी असलेल्या कालमर्यादेत सदरची विकास योजना तयार करणे पुणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. त्यामुळे शासनाने वेगळी कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेच्या ठराव क्र.२३, दि.२४.०४.२०१८ नुसार मिळकत कर आकारणीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) विभागीय कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत

(३४) ४१६६१ (२५-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागातर्फे दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास कायदेशीर अधिकार असलेली एक स्वायत्त आर्थिक 'सामुदायिक संस्था' म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे गठन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दौंड तालुक्यातील सुमारे ५१ महसुली गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य कार्यालय, पुणे येथे असल्याने नागरिकांना त्यांच्या शंकाचे समाधान व निरसन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) विभागीय कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) व (२) होय,हे खरे आहे.
शासन अधिसूचना दिनांक ३१.०३.२०१५ अन्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे गठन करण्यात आलेले आहे.
(३), (४) व (५) दौंड येथे प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

राज्यातील १९९० पूर्वीच्या बंगाली बांधवांच्या जमिनिना स्थायी पट्टे देण्याबाबत

(३५) ४१७७२ (१८-०४-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १९९० पूर्वीच्या बंगाली बांधवांच्या जमिनिना स्थायी पट्टे देण्याबाबत मागील शासनाच्या काळात निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या १९९० पूर्वीच्या बंगाली बांधवांच्या जमिनिना कायमस्वरूपी स्थायी पट्टे देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १९९० पूर्वीच्या बंगाली बांधवांच्या जमिनिना स्थायी पट्टे देण्यासंदर्भात झालेल्या निर्णयाची अजूनही अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याने बंगाली बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बंगाली बांधवांच्या जमिनींना स्थायी पट्टे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०९-२०२२) : (१) हे खरे आहे,
शासनाच्या दिनांक १५.७.१९६५ रोजीच्या अधिसूचनेन्वये गडचिरोली वनवृत्ताच्या कार्यकक्षेत असणाऱ्या वनक्षेत्राचे निर्वनीकरण करुन पूर्व पाकिस्तानी (बंगाली) निर्वासित लोकांचे पुनर्वसन करण्यात आले. तसेच त्यांच्या उदरनिर्वाहाकरिता, शेतीसाठी व निवासाकरिता पट्टे वाटप करण्यात आले व त्याप्रमाणे अभिलेखात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.
(२) बंगाली समुदायाचे पुनर्वसन करताना कायमस्वरुपी पट्टे वाटप करुन अभिलेखात नोंदी घेण्यात आल्या असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील प्राधिकरण तुळजापूर येथील भक्ती निवास १२४ या इमारतीमध्ये सुपर मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत.

(३६) ४२०८३ (२५-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर नगर परिषदेच्या ताब्यात असलेले व तुळजापूर विकास प्राधिकरण मधील भक्ती निवास १२४ या इमारतीमध्ये सुपर मल्टी स्पेशलिटी हॉस्पीटल सुरु करण्याचा ठराव नगर परिषदेने व प्राधिकरणाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीमध्ये कोवीड- १९ च्या प्रादुर्भावामुळे बाधित रुग्णांची व्यवस्था करण्यात आली होती व तेथे आवश्यक बाबींची पूर्तता करण्याबाबत मंदिर प्रशासन व नगर परिषदेने पुढाकार घेवून सोयी-सुविधा उपलब्ध केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू इमारतीमध्ये रुग्णांना ऑक्सीजनची व्यवस्था व्हावी म्हणून तुळजापूर मंदिर संस्थानच्या निधीतून १५० बेडसाठी लागणाऱ्या ऑक्सीसन पाईप लाईनचे काम रु. १२.५० लक्ष खर्च करुन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तुळजापूर शहराच्या आसपासच्या नागरिकांना व मंदिरामध्ये दर्शनसाठी येणाऱ्या भाविकांना इतर मंदिराच्या धर्तीवर चांगली आरोग्य सेवा पुराविण्यासाठी भक्त निवास १२४ या इमारतीमध्ये सुपर मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल उभे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे,
सदर प्रकरणी तुळजापूर नगरपरिषद विषेश सर्वसाधारण सभा ठराव क्र.(०२), दि.०८.०६.२०२० अन्वये ठराव पारित करण्यात आला आहे.
(२) व (३) हे खरे आहे,

(४) तुळजापूर नगरपरिषद विषेश सर्वसाधारण सभा ठरावाच्या अनुषंगाने सदर इमारत आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात नगरपरिषदेमार्फत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी अहवाल सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील जोगेश्वरी जेव्हीएलआस व पश्चिम द्रुतगती महामार्ग या मुख्य जंक्शन जवळ असलेला मौजे मजास ता. अंधरी येथील न.भू.क्र. २२४ (पै.) सर्व्हे क्रमांक ९, हिस्सा क्रमांक ५ या शासनाच्या मालकीचा भूखंडावर फुटबॉलकरिता मैदान उभारण्याबाबत

(३७) ४२३९९ (२५-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील जेव्हीएलआस व पश्चिम द्रुतगती महामार्ग या मुख्य जंक्शन जवळ असलेला मौजे मजास ता. अंधेरी येथील न.भू.क्र. २२४ (पै.) सर्व्हे क्रमांक ९, हिस्सा क्रमांक ५ या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा भूखंड खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू भूखंडावर असलेल्या आरक्षणानुसार या भूखंडावर पश्चिम उपनगरातील उदयोन्मुख फुटबॉलपटूंसाठी फुटबॉल खेळाचे मैदान उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचेकडे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, या प्रकरणी कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू भूखंडावर फुटबॉलकरिता मैदान उभारण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.
बृहन्मुंबई क्षेत्राच्या विकास योजना २०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला शासनाने मंजुरी दिली असुन ती दि.१/०९/२०१८ पासुन अंमलात आली आहे.
मंजूर बृहन्मुंबई विकास योजना २०३४ नुसार मौजे मजास येथील न.भू.क्र. २२४ (भाग) या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर EOS१.५ (उद्यान/बगीचा) ही अस्तित्वातील सुविधा दर्शविण्यात आली.
(२) हे खरे नाही.
तथापि, सदर प्रस्ताव हा मा.आमदार श्री. रविंद्र दत्ताराम वायकर (माजी राज्यमंत्री) यांचेकडुन बृहन्मुंबई महापालिकेच्या उद्यान कक्ष यांच्या कार्यालयास दि.१२/०७/२०२१ रोजी प्राप्त झाला असल्याचे महापालिकेने कळविले आहे.
मंजुर विकास आराखडा २०३४ नुसार सदर भुखंडावर EOS१.५ (उद्यान/बगीचा) ही अस्तित्वातील सुविधा दर्शविण्यात आली असुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नियमावलीतील तरतुदीनुसार उद्यान/बगीचा या आरक्षण/नामनिर्देश दर्शविलेल्या जमिनीवर फ़ुटबॉल खेळाच्या मैदानाचा वापर अनुज्ञेय नाही.
(३) वरील २ प्रमाणे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद शहरातील कचरा डेपो इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत

(३८) ४२४५० (२७-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद शहरामध्ये असलेल्या कचरा डेपोमुळे परिसरातील रहिवाशी व शालेय विद्यार्थ्यांना श्वसनाचा त्रास होत असल्यामुळे सदर कचरा डेपो इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी माहे जानेवारी, २०२२ व तत्पूर्वी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डेपो जवळील परिसरात, भारत विद्यालय सारखे शैक्षणिक विद्यालय, रहिवासी संकुल व नागरीक मोठ्या प्रमाणात राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर कचरा डेपो इतरत्र स्थलांतरित करण्याबाबतचा ठराव नगर परिषदेने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कचरा डेपोमुळे डेपो लगत राहण्याऱ्या नागरिकांना व शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे श्वसनाचा त्रास होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू कचरा डेपोच्या होणाऱ्या त्रासामुळे व सभोवतालच्या नागरिकांच्या आरोग्याचे हित लक्षात घेता कचरा डेपो इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, सदरचा कचरा डेपो शैक्षणिक संस्था व रहिवासी संकुलापासून २०० मीटर अंतरावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

कचरा डेपोवर शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याचे कम्पोस्टिंग करण्यात येत आहे. कचरा डेपोतील कचऱ्यावर व दैनंदिन कचऱ्यावर नियमित दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी करण्यात येते.

(५) सदरहू कचरा डेपो (डंपिंग ग्राऊंड) इतरत्र हलविण्याबाबत सध्या नगरपरिषदेचे कोणतेही नियोजन नाही, असे मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी कळविले आहे.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगर परिषद कार्यालयामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

(३९) ४३२०४ (२५-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगर परिषद कार्यालयामध्ये २) नगर परिषद मुख्याधिकारी, अभियंता, कंत्राटदार, नगराध्यक्ष यानी आपसात संगनमत करून अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये स्वच्छता कंत्राटात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत २) अंबाजोगाई नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रभाग.क्र. ०१ मधिल ए.पी.जे. अब्दुल कलाम फक्शन हॉल समोरील शाहा मस्जिद ते जयवंती नदीपर्यंत नालीचे काम केल्याचे दर्शवुन रक्कम २०,३१,६६४/- रुपयांचे बोगस कामाचे देयके अदा करुन शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत ३) कारखाना फिल्टर हाऊस येथिल विहिरीतील गाळ काढणे प्रकरणामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत तक्रार अर्ज श्री.सारंग पुजारी व शेख रहीम शेख रज्जाक, नगरसेवक अंबाजोगाई यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अंबाजोगाई नगरपालिकेचे नगरसेवक, श्री, शेख रहीम शेख रज्जाक व श्री, सारंग अरुण पुजारी यांनी संपूर्ण कागदोपत्री पुरावे देऊन जिल्हाधिकारी, बीड यांचाकडे तक्रारी दाखल केल्या असुन सदरील तक्रारी सिद्ध होण्यासाठी संपूर्ण कागदोपत्री पुरावे व प्रमाणीत नक्कला सोबत जोडल्या आहेत. परंतु सदरील तक्रारी दाखल केल्यापासुन साधारणत ४ महिन्यांपेक्षाही जास्त कालावधी झालेला असुन त्याबाबत अद्यापयपर्यंत कोणत्याही प्रकारची चौकशी अथवा कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रार अर्जाच्या प्रती निवेदनकर्त्यांनी प्रधान सचिव, मंत्रालय, उपसचिव मंत्रालय, नगर विकास मंत्री, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास वरील तक्रारींची दखल घेत नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यानी जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी वरील तीनही विषयांच्या अनुषंगाने पत्र पाठवून तक्रार अर्जावर प्रधान सचिव (नवि -२), नगर विकास विभाग. यानी 'Pl.send to collector, Beed for enquiry and report' असे निर्देश दिल्याबाबत पत्र पाठविले आहेत. सदर निर्देशानुसार उक्त प्रकरणांमध्ये चौकशी करुन, वस्तुनिष्ठ अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तातडीने सादर करणे बाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळवले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास वरील तक्रारीच्या अनुषंगाने दि. १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदनकर्त्यांना सोबत घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांची समक्ष भेट घेतली, त्यावेळी अंबाजोगाई नगर परिषदेचे मुख्याधिकारी देखील त्याठिकाणी उपस्थित होते. सदरील तीनही प्रकरणामध्ये तात्काळ चौकशी करावी अशी मागणी केली परंतु सदर गंभीर प्रकरणी अद्यापवपर्यंत जिल्हाधिकारी यांचेकडून कोणतीही रितसर व समाधानकारक कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, वरील प्रकरणात कागदोपत्री पुरावे व प्रमाणीत नक्कला पाहता मोठ्या प्रमाणत नगरपालिकेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी शासनाच्या लाखो रुपये रक्कमेचा गैरव्यवहार केल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी वारंवार कागदोपत्री पुराव्यासह तक्रार करून ही जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून वरील गंभीर प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी त्वरित चौकशी करून सर्व संबंधित दोषीवर कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे.
(५), (६) व (७) सदर तक्रारींच्या अनुषंगाने, सुनावणीबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर सुरु आहे.

मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती मार्गालगत असलेल्या दोन्ही बाजूच्या सर्विस रस्त्याची झालेली दुरवस्था

(४०) ४३२१५ (२७-०४-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती मार्गालगत असलेल्या दोन्ही बाजूच्या सर्विस रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्विस रस्त्याच्या दुरावस्थेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर केलेले कामही अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने पुन्हा खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे ह्या मार्गालगत राहणाऱ्या रहिवाश्यांना वारंवार या त्रासाला सामोरे जावे लागत असून अपघात होण्याचीही भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्विस रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) हे खरे नाही, दोन्ही बाजूचे सेवा रस्ते सुस्थितीत आहेत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सेलू ते पाथरी (जि.परभणी) येथील रेल्वे लाईन वर उड्डाणपुलाअभावी वाहतूककोंडी होत असल्याबाबत

(४१) ४३४४४ (१८-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू ते पाथरी (जि.परभणी) येथील रेल्वे लाईन वर उड्डाणपुल नसून सतत रेल्वे फाटक बंद होत असल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या अखेरीस वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे का,

(२) असल्यास, सेलू ते पाथरी येथील उड्डाणपुलाच्या कामाबाबत रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या दोघांमध्ये समन्वय साधण्यासाठी राज्य रस्ते विकास मंडळाकडून कोणतीच उपाययोजना करण्यात येत नसल्याने या रस्त्यावर वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची व नागरिकांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेलू रेल्वे स्थानक हे फार जुने रेल्वे स्टेशन असून या स्थानकांमधुन रेल्वेला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असतानाही रेल्वेलाईनवर उड्डाणपूल नसल्याने उड्डाणपुल बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२६-०९-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदरच्या ठिकाणी उड्डाणपुलाचे (ROB) चे काम हे रेल्वे व महाराष्ट्र शासन यांच्या (MRIDCL-JV of Maharashtra & Railway Infrastructure Development Corporation Ltd.) मार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. MRIDCL यांनी उड्डाणपुलाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सद्यस्थितीत अंदाजपत्रक मुख्य अभियंता,राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.), नवी मुंबई यांचेकडून दि.२९.०८.२०२२ च्या पत्रान्वये प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (MOR&TH), कोकण भवन,नवी मुंबई यांना मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील दहिसर पूर्व येथील प्रभाग क्र.३ व ४ मधील मिनाक्षी मार्बल नाल्याचे रुंदीकरण करणेबाबत

(४२) ४३४७२ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील दहिसर पूर्व येथील प्रभाग क्र.३ व ४ मधील मिनाक्षी मार्बल नाल्याचे रुंदीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिरणामार्फत पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाबाबतच्या नव्याने काढण्यात आलेल्या निविदेत सदरहू कामाचा वाव व व्यवहार्यता तपासून मिनाक्षी नाल्याच्या रुंदीकरणाच्या कामाची तरतुद करण्याचे नियोजित आहे.

अंबाजोगाई (जि.बीड) शहरातील हद्दवाढीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

(४३) ४३५०४ (२७-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरातील हद्दवाढीचा प्रस्ताव शासनाकडे बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई शहरातील आजूबाजूच्या ग्रामीण भागात नवीन घरे, कॉलनी, गृहनिर्माण संस्था झाल्या असून, त्या भागात रस्ते, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा च्या सोयी नसल्यामुळे नागरिकांना नागरीसुविधा मिळण्यासाठी अंबाजोगाई शहराच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव/अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील वन विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या सर्वच कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्याबाबत

(४४) ४३६८६ (३०-०३-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन विभागांतर्गत करण्यात येणारी सर्वच कामे सार्वजनि क बांधकाम विभागाकडून करण्याबाबतची मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव (वने) यांचेमार्फत मागणी दिनांक २० ऑक्टोंबर, २०२१ वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे खरे आहे काय ?

(२) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ? त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०२२) : (१) वन विभागामध्ये सन १९५९ पासून अभियांत्रिकी शाखा अस्तित्वात आहे. सदर शाखेमध्ये एक वन अभियंता १३ उपवनअभियंते आणि ३० सहाय्यक / शाखा / कनिष्ठ अभियंत्याची पदे आहेत. वन विभागातील सर्व स्थापत्य बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत आमदार मा.प्रकाश आनंदराव आबिटकर, विधानसभा सदस्य यांनी दि.२.६.२०२१ च्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(२) वन विभागामध्ये साधारणपणे क्षेत्रीय वन अधिकारी यांचेकडून वन क्षेत्रामध्ये जल व मृद संधारणाची कामे, टाईप नमुना अंदाजपत्रकाप्रमाणे वनकर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम, निरीक्षण कुटी व तपासणी नाका बांधकामे इत्यादी कामे व इमारतीच्या दुरुस्तीची कामे करण्यात येतात.

वन विभागात करावयाच्या स्थापत्य कामांची अंदाजपत्रके वन विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याकडून तयार केली जातात व त्यांची मान्यता विहित कार्यप्रणाली व मर्यादेनुसार सक्षमअधिका-यांद्वारे प्रदान केली जाते. क्षेत्रिय अधिकारी आणि कर्मचारी हे सुध्दा स्थापत्य अभियंत्रिकीमध्ये प्रशिक्षित असल्यामुळे व वन विभागातील अभियंत्यांचे सहाय्य असल्यामुळे बांधकामाची गुणवत्ता राखली जाते.

तथापि, काही स्थापत्य बांधकामे, कामाचे परिणाम व कामातील तांत्रिक बाबी तसेच स्थानिक परिस्थितीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नायगाव (जि.नांदेड) येथील उमरी, धर्माबाद व नायगाव या नगरपालिका क्षेत्रांमध्ये रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(४५) ४३९४९ (२५-०४-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) येथील उमरी, धर्माबाद व नायगाव या नगरपालिका क्षेत्रांमध्ये रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांनी संबंधित विभागास वारंवार तक्रारी देऊनही रस्ते दुरुस्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळ्यात नागरिकांना व वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) अंशतः खरे आहे.

उमरी नगरपरिषद व नायगांव नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांची स्थिती चांगली असून, धर्माबाद नगरपरिषद क्षेत्रातील काही रस्ते खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) धर्माबाद नगरपरिषद हद्दीतील स्थानिकांना पावसाळ्यात प्रवास करताना काही रस्त्यांवर त्रास होतो, ही बाब खरी आहे.

(४) धर्माबाद नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार करण्याचे नगरपरिषद स्तरावर प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे वन विभागांतर्गत खडकवासला विधानसभा क्षेत्रातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रहद्दीत वृक्षारोपणाच्या विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(४६) ४४७१९ (०१-०७-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वन विभागांतर्गत खडकवासला क्षेत्रातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रहद्दीत ग्रा.पं. घेरा सिंहगड येथे गॅबियन बंधारा, चेकडॅम, पाणवठा येथील सन २०२०- २०२२ मधील वृक्षारोपणाच्या विकास कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांबाबत उपवनसंरक्षक, पुणे विभाग यांचेकडून दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी लेखी पत्राव्दारे मागविलेली माहिती माहे जून, २०२२ पर्यंत उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वनपरिक्षेत्रात अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदारांकडून विकास कामांमध्ये गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधीत कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०८-२०२२) :(१) हे खरे नाही.

ग्रामपंचायत घेरा सिंहगड येथे गॅबियन बंधारा, चेकडॅम, पाणवठा येथील सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये वृक्ष लागवड करण्यात आली नाही. तथापि, ग्रामपंचायत घेरा सिंहगड येथे सन २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष कामे पूर्ण करुन

३०.०० हेक्टर क्षेत्रावर ३३,३३० रोपे लागवड करण्यात आली होती. आता सन २०२२-२३ मध्ये सदर कामाचे चतुर्थ वर्ष बांधील काम सुरु असून एकूण २३,६११ इतकी रोपे जिवंत आहेत. सद्यस्थितीत जिवंत रोपांची टक्केवारी ७०.८४% इतकी आहे.
(२) ग्रामपंचायत घेरा सिंहगड येथील वृक्षारोपणा संदर्भात कोणतेही लेखी निवेदन उपवनसंरक्षक, पुणे विभाग या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

किल्ले सिंहगडावर (जि.पुणे,ता.हवेली) जाणारा घाट रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याबाबत

(४७) ४४७९७ (०१-०७-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किल्ले सिंहगडावर (ता.हवेली, जि.पुणे) पर्यटनासाठी जाणारा घाट रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याचे माहे, मे २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घाटातून २८ प्रवाशांना घेऊन येणाऱ्या बसने घाटाच्या कठड्याला धडक देऊन वेळीच बस नियंत्रणात आणल्याने मोठी दुर्घटना टळल्याचे दिनांक १३ मे, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे अरुंद घाट रस्त्याच्या सुरक्षितेच्यादृष्टीने आवश्यक दुरुस्तींबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन घाट रस्ता सुरक्षितेच्यादृष्टीने करावयाच्या दुरुस्ती व उपाययोजनांबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०८-२०२२) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही. सदर रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा असून लांबी २.९० कि.मी. आहे. सदरचा रस्ता वनविभागाच्या हद्दीत असून जिल्हा परिषद पुणे यांच्या अखत्यारीत आहे.
सदर रस्त्याची आवश्यक त्या ठिकाणी रुंदी वाढविणे, वळण सुधारणा करणे, रस्ते सुरक्षा विषयक बाबी करणे व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेले अंदाजपत्रक वन विभागामार्फत जिल्हा परिषद, पुणे यांच्या प्रशासकिय मान्यतेसाठी दिनांक १६.०६.२०२२ रोजी सादर करण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी शहरातील धार रस्त्यावर सिमेंट रस्ता निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(४८) ४५५७८ (०१-०७-२०२२). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील धार येथील सिमेंट रस्ता कामात अतिक्रमणे, विद्युत खांब व डीपी हटविणे गरजेचे असतानाही संबंधित कंत्राटदाराने त्याकडे दुर्लक्ष करत रस्त्याचे काम सुरु करुन ११ मीटर रुंदीचा रस्ता हा केवळ ६ मीटरचा केला असल्याचे माहे जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असतानाही मागील ४ वर्षापासून रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याचे अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी वारंवार स्थानिक नागरीक, सामाजिक संस्था यांचेकडून संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्त्याचे काम सत्वर पुर्ण करण्याबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१७-०८-२०२२) : (१) व (२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे विद्युत खांब व वाहिन्या स्थलांतरीत करण्याकरिता सा.बां. विभागाने निधी वर्ग केला आहे. सदर वाहिन्यांचे स्थंलातरणाचे काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

सदर रस्त्याचे मंजूर ७०० मीटर लांबीचे कॉक्रीटीकरण व चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले असून दुभाजकाचे काम अपूर्ण आहे हे खरे आहे.
(३) हे खरे आहे,
(४) विद्युत खांब व वाहिन्यांचे स्थंलातरीत करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या दुभाजकाचे काम ऑक्टोबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदामध्ये प्रकाशित करण्यात आलेली घनकचरा व्यवस्थापनाची ई-निविदा पुन्हा प्रकाशित करण्याबाबत

(४९) ४७६६५ (१६-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदामध्ये दिनांक ३० एप्रिल, २०२२ रोजी घनकचरा व्यवस्थापनाची ई-निविदा २०२२_DMA_७९३६७७_१ दुसऱ्यांदा प्रकाशित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने श्री स्वामी सर्व्हिसेस, पुणे यांनी ई-निविदा सादर केली असून ई-निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे पहिल्यांदा ई-निविदा प्रकाशित करण्यात आली असतांना एकही संस्था तांत्रिक बाबीत पात्र झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबाजोगाई नगरपरिषद यांनी दुसऱ्यांदा प्रकाशित केलेली ई-निविदा पहिल्यानुसार अटी व शर्ती ठेऊन प्रकाशित केली असून, त्यावेळी सुद्धा त्याच ४ संस्थानी सहभाग घेतला होता व श्री स्वामी सर्व्हिसेस या संस्थेस अपात्र करून बाकी तीन संस्थांची कागदपत्रे अपूर्ण असतानाही पात्र करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकाशित करण्यात आलेली ई-निविदा रद्द करण्यात यावी तसेच निविदा फॉर्ममध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती शिथिल करून पुन्हा ई-निविदा प्रकाशित करण्यात यावी. जेणेकरून जास्तीत जास्त ठेकेदार सहभाग घेऊ शकतील अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ३ जून, २०२२ रोजी त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

अंबाजोगाई शहरातील घनकचरा व्यवस्थापन कामासाठी प्रथमतः दि.२१ मार्च, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या ई-निविदेतील अटी शिथील करुन दुसऱ्यांदा दि.२८ एप्रिल, २०२२ रोजी नव्याने ई-निविदा प्रसिद्ध केली. सदर निविदा प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या ४ निविदांपैकी कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ३ निविदा पात्र ठरविण्यात आल्या आहेत.

(४) हे अंशतः खरे आहे.

अशा आशयाची तक्रार विभागास प्राप्त झाली असून, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांचाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) अंबाजोगाई शहरातील घनकचरा व्यवस्थापन कामाची निविदा प्रक्रिया योग्य व नियमानुसार असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील पारिजात कॉ.ऑप.हौ.सो. मधील मोकळा भुखंड परस्पर विकल्याबाबत

(५०) ४८५०४ (२२-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील पारिजात कॉ.ऑप.हौ.सो. मधील अभिन्यासात असलेला तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी व लहान मुलांना खेळण्याचे नियोजित करण्यात आलेला मोकळा भुखंड परस्पर दुसऱ्यांनीच विकला असल्याने, सदर सोसायटीतील नागरिकांना उक्त भूखंड मोकळा करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.नगरविकास मंत्री, मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई व तहसिलदार, अंबाजोबाई यांच्याकडे दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्यानुषंगाने तहसीलदार यांनी मंडळ अधिकारी यांचा अहवाल व पंचनामा मागवून सदर जागा ही अंबाजोगाई रुरल येथील जमीन सर्व्हे.नं.५९५/ब असून सदर क्षेत्र हे नगरपरिषदेच्या कार्यकक्षेत येत असल्याचे नमूद करत प्रकरण मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई यांच्याकडे नियमाधीन कार्यवाहीस्तव वर्ग केले आहे. हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२२) :(१) हे अंशतः खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मंत्री, महसूल यांना दिलेले दि. ०६ जानेवारी, २०२२ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद यांचा अहवाल व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे प्राप्त अपिलाच्या अनुषंगाने सुनावणीची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.